पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८.

क प्रभाग समिती विशेष सभा

कार्यपत्रिका क्रमांक- १

स भा वृ त्तां त

दिनांक ०६-४-२०१६ वेळ-दुपारी १२.३० वाजता

---------------------- ----------------------

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या "क" प्रभाग समितीच्या सभापती पदाचे निवडीची विशेष सभा बुधवार दि. ०६/०४/२०१६ रोजी दुपारी १२.३० वाजता पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीतील "**महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृह" पिंपरी चिंचवड महापालिका, पिंपरी-१८**. येथे **मा.श्रीमती प्रेरणा देशभ्रतार** पिठासिन अधिकारी तथा अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका,शिवाजीनगर,पुणे. यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करणेत आली होती.सदर सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.पालांडे सुजाता सुनिल
२) मा.बहल योगेश मंगलसेन
३) मा. सौ. पानसरे अमिना महम्मंद
४) मा.गिता सुशिल मंचरकर
५) मा.शितोळे शैलजा बाबुराव
६) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
७) मा.अतुल अरविंद उर्फ नानासाहेब शितोळे
८) मा.प्रशांत शितोळे
९) मा.काटे रोहितअप्पा सुदाम
१०) मा. काटे राजेंद्र भिकनशेठ
११) मा.संजय केशवराव काटे

याशिवाय मा.दत्तात्रय फुंदे- क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय, मा.उल्हास जगताप-नगरसचिव,मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

**मा.अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त,- (पिठासीन अधिकारी)** सन्मा.सदस्य, मा. क्षेत्रीय अधिकारी , उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करते. आजच्या सभेत क प्रभाग समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठी मा. विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणूक केलेली आहे.

मुक्त व निर्भयपणे मा. क प्रभाग समितीच्या सभापती पदाची निवडणूक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे. सचिव यांनी कामकाज सुरु करावे अशी मी सूचना करते.

**मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा** ) -मा. क प्रभाग समितीचे सभापती पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २९ अ (४) नुसार नेमणुक करणेकामी एकूण **०२**

नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामधील उमेदवार, त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे.

| अ.क्र | उमेदवाराचे नांव | सूचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | मा.शितोळे शैलजा बाबुराव | मा.ननवरे जितेंद्र बाबा | मा.पालांडे सुजाता सुनिल |
| २ | मा.शितोळे शैलजा बाबुराव | मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सनी | मा.सौ.पानसरे अमिना महम्मद |

(मा.प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा) यांनी त्यांना प्राप्त झालेले उपरोक्त **०२** नामनिर्देशनपत्रे मा. पिठासीन अधिकारी यांचेकडे सुपुर्त केली. मा.अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त तथा पिठासीन अधिकारी यांनी नामनिर्देशन पत्रांची छाननी केली.)

**मा.अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पिठासीन अधिकारी)** – मा. क प्रभाग समिती सभापती पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या एकूण **२** नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात आली असून ती दोन्ही नामनिर्देशनपत्रे वैध ठरलेले आहे. त्यामध्ये मा.क प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे **१) मा.शितोळे शैलजा बाबुराव** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत. उमेदवारास १५ मिनिटांच्या आत त्यांनी सही केलेली लेखी नोटीस मा. पिठासीन अधिकारी यांचेकडे देवुन त्यांना त्यांची उमेदवारी मागे घेता येईल. अशी कायदयात तरतुद आहे. सभागृहाची संमती असल्यास हा वेळ कमी करता येईल.

(मा.पिठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा अवधी दिला.)

(मा.पिठासीन अधिकारी यांनी उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेला दुपारी १२.३५ ते १२.५० हा १५ मिनिटांचा कालावधी संपला.)

**मा.अतिरिक्त महापालिका आयुक्त (पिठासीन अधिकारी )** - उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या १५ मिनिटाच्या अवधीमध्ये उमेदवारी मागे घेतलेली नसल्याने मा. क प्रभाग समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे **मा.शितोळे शैलजा बाबुराव** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

ठराव क्रमांक-१६८ विषय क्रमांक- १

दिनांक- ०६/४/२०१६ विभाग- प्रशासन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क प्रभाग समिती सभापती पदाचे एका जागेकरिता मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या ०२ (दोन) नामनिर्देशनपत्रामधील मा.क प्रभाग समिती सभापती पदाची निवडणुक लढविणारे **मा.शितोळे शैलजा बाबुराव** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.शितोळे शैलजा बाबुराव** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **मा.क प्रभाग समिती सभापती पदावर** रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाली असल्याचे जाहीर करणेत येत आहे.

सही/-

**(मा.श्रीमती प्रेरणा देशभ्रतार )**

पिठासिन अधिकारी तथा

अतिरिक्त महापालिका आयुक्त,

पुणे महानगरपालिका,पुणे.

यानंतर मा.पिठासीन अधिकारी यांनी नवनिर्वाचित सभापती **मा.शितोळे शैलजा बाबुराव** यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.)

( नवनिर्वाचित सभापती **मा.शितोळे शैलजा बाबुराव** यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्विकारले)

ठराव क्रमांक- १६९ विषय क्रमांक- २

दिनांक- ०६/४/२०१६ विभाग- प्रशासन

सुचक- मा. सुषमा तनपुरे अनुमोदक-मा.गिता मंचरकर

क प्रभाग समितीच्या मासीक सभेचा दिनांक व वेळ निश्चित करणे.

क प्रभाग समितीची मासिक सभा ही प्रत्येक महिन्याचे **पहिल्या बुधवारी दु. ३.०० वा.** (**पहिल्या** बुधवारी सार्वजनिक सुट्टी / सुट्टया असेल तर दुस-या दिवशी) क क्षेत्रीय कार्यालयाचे श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

वरीलप्रमाणे सभेचे कामकाज होऊन नवनिर्वाचित **सभापती मा.शितोळे शैलजा बाबुराव** यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
(**मा.शितोळे शैलजा बाबुराव**)
सभापती
क प्रभाग समिती, भोसरी २६.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - २६.
क्र-कक्षेका/कावि/ ६०/२०१६.
दिनांक- ०६/०४/२०१६.



प्रशासन अधिकारी
तथा सचिव सभाशाखा
क प्रभाग समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.